दैनिक

अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १४६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२५ ऑगस्ट २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# ‘५० खोके, एकदम ओके’वरुन राडा

## विधीमंडळाच्या पायऱ्यांवर शिंदे गट-राष्ट्रवादीचे आमदार भिडले

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**राज्याच्या पावसाळी अधिवेशनाच्या आजच्या दिवसाची सुरुवात सत्ताधारी आणि विरोधकांच्या जोरदार राड्यानं झाली आहे. ज्या विधानभवनात राज्याच्या जनतेसाठी कायदे आणि निर्णय घेतले जातात त्याच विधानभवनाच्या पायऱ्यांवर आज सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राडा झाला. विधानसभेच्या पायऱ्यांवर विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांविरोधात घोषणाबाजी आणि आंदोलनं याआधीही केली जात होती. यात काही नवी बाब नाही. पण आज चक्क सत्ताधाऱ्यांनी विरोधकांकडून गेल्या दोन दिवसांपासून केल्या जात असलेल्या आंदोलनाचा निषेध व्यक्त करण्यासाठी निषेधाचा कार्यक्रम आयोजित केला गेला.**



महाविकास आघाडीच्या आमदारांनी गेल्या काही दिवसांपासून विधीमंडळाच्या पाऱ्यांवर रोज आंदोलन केले. आम्ही आज केले. आम्ही १७० आहोत, ते ९९-१००. आम्ही सगळेच आलो असतो तर काय झाले असते. ते आमच्यावर आंदोलन करून आरोप करत होते. तेव्हा आम्ही बाजुने जात होतो. त्यांना उत्तरही देत नव्हतो. आज आम्ही पहिले तिथे होतो. त्यांचा इतिहास काढत होतो. ते त्यांना झोंबले. आमच्या आडवे आले तर आम्ही त्यांना आडवे जाऊ. आमच्या अंगावर कुणी आले तर शिंगावर घेऊ.

**आ.भरतशेठ गोगावले, शिंदे गट**

विरोधक आमदार विधानसभेच्या पायऱ्यांवर येण्याआधीच शिंदे गटातील आमदारांनी त्याठिकाणी येऊन विरोधकांविरोधात घोषणाबाजी सुरू केली. त्यानंतर विरोधी पक्षातील आमदार विधानसभेच्या पायऱ्यांजवळ येताच त्यांनीही सत्ताधाऱ्यांविरोधात घोषणाबाजीला सुरुवात केली. त्यानंतर दोन्ही गटातील आमदारांमध्ये शाब्दीक बाचाबाजी झाली. पुढे याचं रुपांतर धक्काबुक्की आणि शिवीगाळ करण्यातही झालं.

शिंदे गटाच्या आमदारांनी शिवीगाळ केली, धक्काबुक्की केली. यामुळे विधीमंडळाच्या पायऱ्यांवर गोंधळ उडाला. अखेर अजित पवार आले आणि आम्हाला बाजुला होऊया म्हणाले. त्यामुळे आम्ही बाजुला झालो.

**अमोल मिटकरी, राष्ट्रवादीचे आमदार**

# केंद्र शासनाच्या योजना तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवाव्यात : ना.प्रल्हाद सिंह पटेल



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र शासनाच्या माध्यमातून विविध लोकोपयोगी योजना राबविण्यात येत असून या योजनांचा लाभ तळागाळातील लाभार्थ्यांना द्यावा, असे प्रतिपादन केंद्रीय अन्न प्रक्रिया, उद्योग आणि जलशक्ती राज्यमंत्री प्रल्हाद सिंह पटेल यांनी आज येथे केले. अलिबाग येथील जिल्हा नियोजन भवन सभागृहामध्ये आयोजित शासकीय विभागांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

प्रारंभी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी केंद्रीय राज्यमंत्री प्रल्हाद सिंह पटेल यांचे छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा, शाल व पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांनी जिल्ह्यातील जल जीवन मिशन योजनेच्या सद्य:स्थितीबाबत सादरीकरण केले.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविंद्र पाटील, माजी आमदार विनय नातू, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, रत्नागिरी जिल्हाधिकारी डॉ.बी.एन.पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.गणेश देशमुख, अलिबाग उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे तसेच विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी व विविध योजनांचे लाभार्थी उपस्थित होते.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रल्हाद सिंह पटेल म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या सर्वांगिण विकासासाठी केलेले प्रयत्न त्यांचे आचार, विचार, लोकाभिमुख धोरण तसेच केंद्राच्या विविध लोकोपयोगी योजना यांचा प्रचार व प्रसार करणे आवश्यक आहे. स्वच्छ भारत कार्यक्रम केंद्राने हाती घेतल्यानंतर अनेक गावे स्वच्छ झालेली दिसत आहेत. गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी केंद्र शासनाने लोक कल्याणकारी योजना सुरू केल्या असून या योजनांचा लाभ तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवून गाव, वस्ती वाडीवर अजून काही प्रश्न, समस्या असतील तर त्या जाणून घेवून सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल.

या आढावा बैठकीत केंद्रीय राज्यमंत्री प्रल्हाद सिंह पटेल यांनी विविध योजनांचा आढावा घेतला व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना केल्या.

याप्रसंगी केंद्रीय राज्यमंत्री प्रल्हाद सिंह पटेल यांच्या हस्ते प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेसहित विविध योजनेच्या लाभार्थ्यांना लाभवाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रधानमंत्री सूक्ष्म

…/२

# मुख्यमंत्री शिंदे साहेब रायगडचे डॅशिंग आ.भरत गोगावले यांना गृह राज्यमंत्री करा

## रायगड वासियांची मागणी

**अरविंद पोतदार**

**पनवेल** : रायगड जिल्ह्यात समाजवादी, काँग्रेस यांची पाळेमुळे रुजली असताना ती मुळापासून उपटून काढून गेले तीन वेळा शिवसेनेचा बालेकिल्ला शाबुत ठेवण्याचे काम भरत गोगावले यांनी केले असल्यामुळे त्यांना महाराष्ट्राचे गृह राज्यमंत्री पद देवून आपण त्यांचा आदर करावा, अशी मागणी रायगड वासियांमधून केली जात आहे.

रायगड जिल्ह्यात गेले कित्येक वर्षे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि यापूर्वी समाजवादी पक्ष यांचा बालेकिल्ला म्हणून रायगड ओळखला जात होता. त्यामध्ये महाड, पोलादपूर तालुका हा समाजवाद्यांचा बालेकिल्ला होता.



परंतु त्या बालेकिल्ल्याला खिंडार पाडण्याचे काम शिवसेनेने केले आणि तेथे माजी गृहराज्यमंत्री स्व.प्रभाकर मोरे यांनी तो बालेकिल्ला फोडला आणि शिवसेनेने प्राबल्य यामध्ये मतदार संघात प्रस्थापित केले. परंतु पुन्हा डोके वर काढून काँग्रेसने या मतदार संघात शिरकाव करण्याचा प्रयत्न करून स्व.माणिक जगताप यांना काँग्रेसचे आमदार म्हणून निवडून दिले. स्व.माणिक जगताप हे निवडून आल्यावर हा किल्ला काँग्रेसकडे अबाधित राहणार अशी शंका व्यक्त करण्यात येत होती. परंतु शिवसेनेने भरत गोगावले या तरुणांना शिवसेनेची उमेदवारी देवून हा महाड पोलादपूरचा गड शिवरायांच्या आशिर्वादाने पुन्हा शिवसेनेकडे आणला. आणि गेले १५ वर्षे भरत गोगावले हे महाड-पोलादपूरचे आमदार असून त्यांनी मतदार संघाची फाळणी होवून देखील अबाधित राखला आणि त्यांनी माणगाव, महाड, पोलादपूर, म्हसळा असा भाग पिंजून काढून शिवसेनेचे प्राबल्य निर्माण केले. आणि म्हणूनच अशा डॅशिंग विधानसभा सदस्यांना शिंदे साहेब आपण राज्याचे गृहराज्यमंत्री पद देवून पुन्हा रायगड वासियांचा सन्मान करा, अशी मागणी रायगड जिल्ह्यातील शिवसैनिकांकडून केली जात आहे.



## संक्षिप्त...

### माझ्याविरोधात काहीही पुरावे नाहीत, राज कुंद्राची न्यायालयात धाव

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मोबाईल ॲपवर पोर्नोग्राफिक फिल्म्स तयार करणे आणि ती अपलोड केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी गेल्या वर्षी गुन्हा दाखल केलेला उद्योगपती राज कुंद्रा याने याप्रकरणी आरोपमुक्त होण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

बॉलिवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टी हिचा पती राज कुंद्रा याला जुलै २०२१ मध्ये अटक करण्यात आली. सप्टेंबर २०२१ मध्ये महानगर दंडाधिकारी न्यायालयाने त्याची जामिनावर सुटका केली. अश्लील चित्रपट आपण केले नाहीत किंवा त्यांची विक्रीही केली नाही. आर्मस्प्राईम मीडिया प्रायव्हेट लिमिटेड (एएमपीएल) मध्ये गुंतवणूक केली होती. मात्र, या कंपनीचाही अश्लील चित्रपटांशी काहीही संबंध नाही, असे कुंद्रा याने याचिकेत म्हटले आहे. पोलिसांनी दाखल केलेल्या पहिल्या आरोपपत्रात माझ्याविरोधात काहीही पुरावे नाहीत किंवा पुरवणी आरोपपत्रात मी व माझ्या कंपनीचा आयटी प्रमुख रायन थॉर्प यांनी पीडितांना जबरदस्ती केली आहे , धमक्या दिल्या आहेत, असेही नमूद करण्यात आले नाही, असे कुंद्रा याने याचिकेत म्हटले आहे. कोणत्याही कलाकारांनी (एएमपीएलचे क्लायंट) तथाकथित चित्रीकरण आणि कामुक सामग्रीच्या प्रसारणाबाबत कधीही कोणतीही तक्रार केली नाही किंवा कोणताही इशारा दिला नाही, असे याचिकेत म्हटले आहे. तपासातून प्रथमदर्शनी आपण गुन्हा केल्याचे उघड होत नाही. आरोप निश्चित करण्यासाठी पुरेसे पुरावे नसल्याने आपल्याला सदर गुन्ह्यातून आरोपमुक्त करण्यात यावे, अशी मागणी कुंद्रा याने केली आहे.

# पनवेल रेल्वे स्थानकाकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । पनवेल**



आशिया खंडातील सर्वात मोठे टर्मिनल अशी ख्याती असलेल्या पनवेल रेल्वे स्थानकाकडे सरकारचे अक्षम्य दुर्लक्ष असल्याचे प्रवासी वर्गात बोलले जात आहे.

पनवेल रेल्वे स्थानकातुन विविध राज्यात रोज शेकडो गाड्या अपडाऊन होत असतात. यात एल.बी.जी.कोचेस गाड्यांत महिलांवर्गाकरीता डबा नाही तसेच अपंगांकरीता स्वतंत्र आसनव्यवस्था नाही. हळूहळू सदर डबे कमी करण्यात आले. १० ते १५ वर्षे झाली साधा सब वे देखील जो पनवेल स्थानकातुन नविन पनवेल बाजुकडे पॅसेंजर करीता ये जा करण्याकरीता होणे अंत्यत जरूरीचे होता तो पुर्ण झालेला नाही. प्लॅट फॉर्म क्रमांक ६ व ७ येथे टॉयलेटची व्यवस्था नाही. लिफ्ट चे कामही अर्धवट अवस्थेत आहे प्लॅट फॉर्म क्रमांक ६ व ७ ला काही ठिकाणी पत्रे नसल्याने पावसाच्या दिवसात प्रवाशांना भिजावे लागते तर उन्हाळ्यात कडक उन्हात आधीच जीने चढताना दमछाक होते वर उन्हाचा त्रास सहन करावा लागतो. पनवेल सारख्या मोठ्या टर्मिनल मध्ये रोज लाखो प्रवाशी प्रवास करतात परंतु फक्त ६ व ७ प्लॅट फॉर्म ला सरकता जिना आहे. अन्य ठिकाणी आजही सरकत्या जिन्याची वानवा आहे.

अंडर ग्राऊंड सब वे चे काम फक्त मोठे खड्डे खोदुन पडले आहे. सदर खड्यात ४ वर्षे पुर्वी दुर्घटना घडुन ३ मुलींचा रेल्वे प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे त्यांचा अंत झाला होता. रेल्वे स्थानकाच्या नविन पनवेल बाजु कडे रेल्वेच्या जागेत अनधिकृत पार्कींग स्थळच जणु काय प्रवासी वर्गाने केले आहे. त्यामुळे एखादी दुर्घटना घडल्यास रूग्णवाहिका येणार कुठुन असा प्रश्न ही सुज्ञ प्रवाशी वर्गाकडुन विचारला जात आहे. नवीन पनवेल बाजुकडे जीने उतरल्यावर तिकीट केंद्र जवळ फेरीवाल्यांनी जणु काही मार्केटच थाटल्याने जेष्ठ नागरीक लहान मुले प्रवाशी वर्गाला चालणे मुश्किल होते. याकडे रेल्वे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे प्रवासी वर्गात बोलले जात आहे. तर पनवेल बाजुकडुन रेल्वे स्थानकाचा येणारा रस्ता अतिशय छोटा असल्याने रिक्षा थांबा बाजुला असणारी रेल्वेच्या जागेतील जुनाट भिंत काढुन टाकल्यास हा रस्ता देखील मोठा होऊ शकतो असे बोलले जात आहे. रोह्या पासुन कोकण रेल्वेची हद्द सुरू होते. परंतु तेथीलही माणगाव, गोरेगाव, पेण, विर, अशा काही स्थानकावर अस्वछता असल्याचे जाणवते पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, बिस्कीट तसेच पॅकिंग केलेले खाद्य पदार्थाच्या प्लास्टीकचा कचरा कोकण रेल्वेच्या विविध स्थानकावर विखुरलेला दिसत असतो. स्थानकांच्या स्वच्छंतेचे ठेकेदार हे केवळ शासनाच्या ठेक्याची बिले वसुलीच्या कामातच व्यस्त असल्याचे नागरिकांतुन बोलेले जात आहे. शासनाने याकडे वेळीच लक्ष घालुन पनवेल रेल्वे स्थानक व कोकण रेल्वेच्या प्रवाशी वर्गाचा प्रवास अडचणी प्राधान्याने सोडवाव्यात अशी मागणी केली जात आहे.



केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग आणि जलशक्ती राज्यमंत्री प्रल्हादसिंग पटेल यांनी आज (बुधवार, दि. २४ ऑगस्ट) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या पनवेल येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी मंत्री महोदयांचे लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबियांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी अर्चना परेश ठाकूर, तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांचे चिरंजीव अमोघ ठाकूर.

# ‘बाप्पा’च्या आगमनाला खड्ड्यांचे विघ्न ; डांबरीकरण रस्त्यावर मातीचा मुलामा

**दै.रायगड नगरी । दिघी**

सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत्या असलेल्या श्रीवर्धन - बोर्लीपंचतनमार्गे वडवली फाटा या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे आहेत. त्यामुळे हा रस्ता नक्की खड़्यांत आहे की रस्त्यावर खड्डे असा प्रश्न पडला आहे. गंभीर बाब म्हणजे लाडक्या गणरायाचे आगमन ही याच खड्डेयुक्त रस्त्याने होणार आहे. मात्र खड़्यांचे विघ्न श्रीवर्धन च्या बांधकाम प्रशासन ला दूर करता नाही आले.

बोर्लीपंचतन शहराची मुख्य बाजारपेठ व शहरालगत ज्ञानमंदिर पर्यंत आणि शिस्ते गावालगत रस्त्याची अनेक वर्ष डागडुजी न केल्याने खड्ड्यांचा भस्मासुर पावसामुळे अधिक तीव्रतेने नागरिकांच्या जिवावर उठला आहे. सध्या उपाय म्हणून सार्वजनिक बांधकाम खात्याचे कामगार अभीयांत्याच्या अनुपस्थितीत स्वतः हुन खड्डे बुजवताना दिसतात. खड्डे व्यवस्थित न बुजवल्यामुळेच खड्ड्यांतील माती वाहून गेली आणि खड्ड्यांनी उग्र स्वरूप धारण केले. खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी भरल्याने त्याच्या खोलीचा अंदाज चुकत असल्यामुळे वाहनचालकांच्या जिवालाच धोका निर्माण झाला आहे. तर दुसरीकडे बोर्ली बाजारपेठेत चिखलाचे साम्राज्य वाढल्याने बाजारहाट साठी आलेल्या नागरिकांना चालणं मुश्किल बनलं आहे.

खड्डे बुजवण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा

…/२



# रस्त्यांचा नरक कुणी केला?

एकीकडे बुलेट ट्रेन, समृद्धी महामार्ग, सागरी मार्ग, मेट्रोचे जाळे, प्रत्येक मोठ्या शहराबाहेर वर्तुळाकार बाह्यमार्ग अशी अनेक स्वप्ने महाराष्ट्रातील सामान्य नागरिकांच्या गळ्यात बांधणाऱ्या राज्यातील त्रिस्तरीय कारभाऱ्यांना 'खड्डे नसणारे रस्ते' हे साधे आणि किमान काम मात्र आजतागायत करता आलेले नाही. देशात सर्वाधिक अपघात महाराष्ट्रात होतात आणि सर्वाधिक रस्तेबळीही जातात. जितके बळी जातात, त्याच्या साधारण अडीचपट नागरिक जखमी होतात. त्यातले अनेक कायमचे अपंग होतात. हे सारे अपघात खड्ड्यांमुळे होतात, असे नाही; मात्र राज्यभरातल्या असंख्य खड्ड्यांनी असुरक्षित, बेपर्वा आणि जिवावर उदार होऊन प्रवास करण्याची जी संस्कृती जन्माला घातली आहे; तिचाच हा सारा परिणाम आहे. अगदी परवा पुणे ते नाशिक मार्गावर खड्डे चुकविण्याच्या नादात कारला झालेल्या अपघातात केवळ १९ वर्षांचा प्रवासी मुलगा मरण पावला. त्याचा काय दोष किंवा गुन्हा होता? अशी असंख्य उदाहरणे राज्यभर अहर्निश घडत आहेत. माजी आमदार विनायक मेटे यांच्या अपघाती मृत्यूचा प्रश्न विधिमंडळात निघाला; तेव्हा उपमुख्यमंत्र्यांनी चालकाच्या चुकीमुळे हा अपघात झाल्याचे सांगितले. यावेळी, आमदार वर्षा गायकवाड यांनी 'सर्वच महामार्गांवर अपघात होत आहेत आणि त्यांचे कारण खड्डे हेच आहे,' हे सांगितले. कोकणात चाळण झालेल्या रस्त्यावर आपल्या डोळ्यांदेखत झालेल्या अपघाताचे उदाहरणही त्यांनी दिले. राज्यभरातल्या स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य सरकार आणि राष्ट्रीय महामार्गांबाबत केंद्र सरकार असे सगळे राज्यातील या दुर्दशेला जबाबदार आहेत. मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळात बोलताना, 'दोन वर्षांत मुंबईतील प्रत्येक रस्ता सिमेंटचा होईल,' असे आश्वासन दिले. प्रत्येक गल्लीबोळ सिमेंटचा करणे, हे या समस्येवरचे खरे उत्तर नाही, हे तज्ज्ञांनी सरकारला सांगायला हवे. काही काळापूर्वी जागरूक नागरिकांमुळे सिमेंटचे सदोष रस्ते फोडून पुन्हा टाकावे लागले होते. डांबराचाही उत्तम रस्ता अनेक वर्षे टिकतो आणि अतिपावसाने खराब होत नाही. मुंबईचा मरीन ड्राइव्ह किंवा पुण्यातील जंगली महाराज रस्ता ही त्याची उदाहरणे आहेत; पण आपल्याकडे एखादे खूळ निघाले, की सगळे त्याच्याच मागे धावत सुटतात. त्यात बरेच हिशेब असतात. अगदी छोटे, वळणांचे किंवा घरांना लागून असणारे रस्ते सिमेंटचे करणे अतिशय त्रासदायक असते. त्यापेक्षा, रस्त्यांच्या कामात खाबूगिरी, भ्रष्टाचार, टक्केवारी आणि कंत्राटदारशाही चालू देणार नाही, अशी प्रतिज्ञा राज्य सरकार किंवा मुंबईसारखी अतिश्रीमंत आणि भ्रष्टाचाराचा आरोप असलेली महापालिका का करीत नाही? आपला मुलगा मुंबईतल्या खड्ड्यांमुळे मरण पावला, हा पुत्रवियोग बाजूला ठेवून दादाराव भिलोरे हा सामान्य नागरिक इतर कुणावर अशी वेळ येऊ नये, म्हणून खड्डे बुजवत सुटतो. शेकडो खड्डे बुजवतो. त्याला इतर अनेक संस्था मदत करतात. अनेक समदु:खी पुढे येतात. या अपत्यशोकाची वेदना आणि ती बाजूला ठेवून हातात फावडे-घमेले घेणारा बाप, हे चित्र काळजात नेण्याइतकी संवेदनाच कंत्राटदार, नोकरशाही, राज्यकर्ते आणि राजकीय पक्षांमध्ये उरलेली नाही. यांच्या लंब्याचवड्या बाता नागरिकांनी ऐकायच्या आणि माना डोलवायच्या. इतकी कमावती माणसे खड्डे व खराब रस्त्यांमुळे मरतात, जखमी होतात, कुटुंबे उघड्यावर येतात, तरुण कायमचे जायबंदी होतात, याला एक प्रकारे आपण जबाबदार आहोत, याची या साऱ्यांना शरम कशी वाटत नाही? मुंबईतील रस्त्यांची तर वेगवेगळ्या संस्थांनी आपापल्या हद्दीत स्वतंत्रपणे वाट लावली आहे. त्यांना परस्परांशी सहकार्य करायचे नाहीच. 'चांगले रस्ते हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे,' असे मुंबई उच्च न्यायालयाने २०१५ मध्ये म्हटले होते. त्यानंतर, आता सात वर्षांनी राज्यातील रस्त्यांच्या प्रश्नांवर स्वतंत्र खंडपीठच स्थापन करण्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाला घ्यावा लागला आहे. केरळच्या उच्च न्यायालयाने प्रत्येक जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा रस्त्यांवरील खड्ड्यांबद्दल उत्तरदायी असेल, असा निकाल दिला आहे. महाराष्ट्रातही असे करावे लागेल. अधिकारी कोणताही असो; खड्ड्यांमुळेच अपघाती मृत्यू झाल्यास अशी जबाबदारी असणारा अधिकारी व त्या रस्त्याचा कंत्राटदार यांच्यावर 'सदोष मनुष्यवधा'चा खटला चालवला जायला पाहिजे. मुंबई उच्च न्यायालय स्वतंत्र खंडपीठ नेमू शकते, तर राज्य सरकार संपूर्ण राज्यातील रस्त्यांची जबाबदारी घेणारे स्वतंत्र प्राधिकरण का निर्माण करू शकत नाही? या प्राधिकरणाने ग्रामसडकांपासून महामार्गांपर्यंत प्रत्येक रस्त्याच्या निगराणीची जबाबदारी घ्यावी. महाराष्ट्र हा शहाणपणाची खाण असेल, तर किमान खड्डेमुक्त रस्ते करता आलेच पाहिजेत. नाही तर, राज्यातले रस्तेकंत्राटदार, नोकरशहा आणि टक्केश्वर लोकप्रतिनिधी यांना जालीम धडा शिकविण्याची सत्याग्रही रीत नागरिकांनीच शोधून काढावी. हातावर हात ठेवून सगळे सहन करणारे निरिच्छ नागरिकही या रस्त्यांच्या नरकाला जबाबदार आहेत. अशा निष्क्रिय समाजाला कोण भीक घालणार?

# वर्षभरासाठी साठ हजार कोटी निधी राखीव : ना.प्रल्हाद सिंह पटेल




**दै.रायगड नगरी । पेण**

देशाचे केंद्रीय राज्यमंत्री प्रल्हाद सिंह पटेल यांचा मागील चार दिवस कोकण दौरा सुरु असून त्यांनी आज रायगड जिल्ह्यातील पेण शहरातील रोहिदास नगर आणि तालुक्यातील वाशी गावातील नागरिकांशी संवाद साधला. हा संवाद साधतेवेळी देशाचे केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग आणि जलशक्ती राज्यमंत्री प्रल्हाद सिंह पटेल यांनी जलशक्ती खात्याच्या माध्यमातून वर्षभरासाठी तब्बल साठ हजार कोटी रूपयांची भरघोस तरतूद केली आहे त्याचा पुरेपूर फायदा नागरिकांनी घ्यावा असे आवाहन केले. यावेळी या संवाद यात्रेत माजी मंत्री तथा विद्यमान आमदार रविशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर,नगराध्यक्षा प्रितम पाटील,भाजपचे जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, जनार्दन जाधव, रोहीदास समाजाचे अध्यक्ष भरत साळवी, प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, तहसिलदार स्वप्नाली डोईफोडे, नायब तहसीलदार नितिन परदेसी, आरोग्य अधिकारी डॉ अपर्णा खेडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

समाजातील तळागाळातील नागरिकांपर्यंत केन्द्र शासनाच्या योजना पोहोचल्या पाहिजेत, नव्हे तर त्या योजनांचा लाभ या नागरीकांना पुरेपूर घेता आला पाहिजे, केन्द्र शासनाचे मंजुर केलेला निधी गोरगरीब जनतेच्या हितासाठी वापरला गेला पाहिजे आणि तो निधी वापरला जातो का, किंवा जनतेच्या काय मागण्या आहेत, काय समस्या आहेत हे जाणून घेण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय राज्यमंत्री प्रल्हाद सिंह पटेल यांना राज्यातील कोकण जनसंवाद यात्रा करण्याचे आदेश दिले. त्यानुसार मागील चार दिवस हा कोकण दौरा सुरु आहे.जलशक्ती विभागाच्या माध्यमातून स्वच्छता, पाणी आदी विभागाच्या असंख्य योजना राबविण्यासारख्या आहेत. या योजनांची माहिती देऊन प्रल्हाद सिंह पटेल यांनी आपल्या देशाने कोरोना काळात देशातील कोट्यावधी नागरिकांची लसीकरणाची व्यवस्था पूर्ण करून जवळपास दीडशे देशांना लस पुरविण्याचे काम आपल्या देशाने केले आहे. चीन सारख्या देशाची लस इतर देशांनी नाकारली मात्र आपल्या देशाला पसंती दिली हे केन्द्र शासनाचे आणि आपल्या देशाचे यश आहे. आपण आपल्या माध्यमातून साठ हजार कोटी रुपयांची तरतूद केली असुन गतवर्षी ज्या राज्यांनी या विभागाद्वारे कामे केली असतील त्यांनी या निधीतून हा खर्च वर्ग करून घ्यावा, तसेच या तालुक्यातील पाणी योजनेसाठी देखील या निधीचा पुरेपूर वापर करून घ्यावा असे आवाहन केले. वाशी खारेपाट विभागाचा पाणी प्रश्न लवकरच सुटणार असल्याचे आमदार रविशेठ पाटील यांनी या वेळी सांगितले.

# भागुबाई चांगू ठाकूर लॉ कॉलेजमध्ये एलएलएम कक्ष



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयात एलएलएम समन्वयक कक्ष सुरू करण्यात आला आहे.

या कक्षाचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी (दि. २३) झाले. या वेळी त्यांनी येत्या काळात आपले विधी महाविद्यालय नवी मुंबईतच नव्हे; तर संपूर्ण मुंबईतील उत्कृष्ट विधी महाविद्यालय म्हणून नावलौकिक मिळवेल, असा विश्वास व्यक्त केला.

भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयास एलएलएम कोर्सची मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार या महविद्यालयात एलएलएम समन्वयक कक्ष सुरू झाला असून या कक्षाचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमास संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य धनश्री कदम, इंजिनियर दर्शन ठाकूर, सहाय्यक प्राध्यापिका संघप्रिया शेरे, रवनीश बेक्टर, ममता गोस्वामी, हिमांशू मोरे, भाग्यश्री कांबळे, ग्रंथपाल जान्हवी भोईर, सहाय्यक ग्रंथपाल तेजस्विनी कारखानीस, पल्लवी खोत, ऋषिकेश हुद्दार, उज्वल पाटील आदी उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महाविद्यालयात दर्जेदार कायदा शिक्षण देण्यासंदर्भात विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन केले.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाविकांसाठी जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा आरोग्य सुविधांसह सज्ज

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्यात दि.३१ ऑगस्ट २०२२ पासून साजरा होणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर या कालावधीत मुंबईहून कोकणामध्ये राष्ट्रीय महामार्ग क्र.१८ व क्र.४ वरुन मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरु होते. यावेळी अपघात होवून जीवितहानी तसेच प्रवासी जखमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा वेळी अपघातग्रस्त रुग्णांना तातडीची वैद्यकीय सेवा मिळावी म्हणून जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हमरापूर, वडखळ, वाकणफाटा, कोलाड नाका, इंदापूर, दासगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय पथक पुरेशा औषधसाठा व रुग्णवाहिकेसह सुसज्ज ठेवण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे यांनी दिली आहे.

हमरापूर :- या ठिकाणी पथक प्रमुख वैद्यकीय अधिकारी, डॉ.दिक्षिता मोकल, मो.९०२८२८६६०५, आरोग्य सहाय्यक, श्री.विकास पाटील, मो.९७६७३४३०६९, आरोग्य सेवक श्री.शांताराम घरत,मो.९८९०८०२०१०,आरोग्य सेविका, श्रीम.सी.व्ही. म्हात्रे, मो.९०७५०१९०६१, वाहन चालक श्री.किरण पाटील, मो.९२६००२२१४९, शिपाई, श्रीमती जे.डी. दळवी, म्ब्युलन्स क्रमांक एम.एच.०६ बीडब्ल्यू ५६२३.

वडखळ :- या ठिकाणी पथक प्रमुख वैद्यकीय अधिकारी, डॉ.संजय गांगुर्डे, मो.९०२९८१८९०४, आरोग्य सहाय्यक, श्री.तुकाराम मोकल, मो.९२२६७६१५४८,आरोग्य सेवक, श्री.संदिप ठाकूर,मो.८०८०१६६२६०,आरोग्य सेविका, श्रीम.शर्वरी तिवरेकर, मो.८१४९६६०११४, वाहन चालक श्री.सागर पाटील, मो.७३५०७४६४००, शिपाई, श्रीमती रेश्मा पवार, म्ब्युलन्स क्रमांक एम.एच.०६ बीडब्ल्यू ५६२९.

वाकणफाटा :- या ठिकाणी पथक प्रमुख वैद्यकीय अधिकारी, डॉ.अदित्य शिरसाठ, मो.९९२३२५२९७४, आरोग्य सहाय्यक, श्री.एच. जे.डोळकर, मो.९८५०९२०१०७, आरोग्य सेवक, श्री.जे. जे.वारगुडे, मो.९२१७१९६४०७३, आरोग्य सेविका, श्रीम.माया अनवाने, वाहन चालक श्री.अल्हाद पिंगळे, मो.८९७५४०८३५८, शिपाई, श्री.भाऊ आमडोसकर, मो.९२७३०८७७१६ म्ब्युलन्स क्रमांक एम.एच.०६ बीडब्ल्यू ५८२५.

कोलाड नाका :- या ठिकाणी पथक प्रमुख वैद्यकीय अधिकारी, डॉ.महेश वाघ, मो.८८७९८७३५७०, आरोग्य सहाय्यक, श्री.एस.आर.गायकवाड,मो.९५५२६६२३९५, आरोग्य सेवक, श्री.गणेश शिरसाठ,मो.९६६५६६५८९९, आरोग्य सेविका, श्रीम.सायली ठाकूर, वाहनचालक श्री.अमर आंबुसकर, मो.९२७३०८७७१६, शिपाई, श्रीमती बी.बी.देशमुख, मो.९२२५३३५४९९ म्ब्युलन्स क्रमांक एम.एच.०६ बीडब्ल्यू ९२१६.

इंदापूर :- या ठिकाणी पथक प्रमुख वैद्यकीय अधिकारी,डॉ.सुरज म्हात्रे, मो.८२३७७१८३३३, आरोग्य सहाय्यक, श्री.चंद्रमोहन सायगावकर, मो.९४२१४५५२५४, आरोग्य सेविक, श्री.संजय राऊत, मो.७०३८६४४४३८, आरोग्य सेविका, श्रीम.पी.पी. गावंड, मो.७८४३०५३३८८, वाहन चालक श्री.स्वप्निल विध्वंस, मो.८१४९८०५००३, शिपाई, श्री.सुनिल भादुर्गे, मो.९५७९५८४३४४ म्ब्युलन्स क्रमांक एम.एच.०६ बीडब्ल्यू ५८०९.

दासगाव :- या ठिकाणी पथक प्रमुख वैद्यकीय अधिकारी, डॉ.अनसार आफ्रीन, मो.९११२०८०८०६, आरोग्य सहाय्यक, श्री.पी.एम.पाटील, मो.९२७३४२७४७४, आरोग्य सेवक, श्री.डी.के.हाटे, मो.९९७५२४६०१५, आरोग्य सेविका, श्रीम.एस.व्ही. जोशी, मो.९६५७१४९४४२, वाहन चालक श्री.राकेश बांधणकर, मो.९२२३८४८२३४, शिपाई, श्रीमती रंजना मोरे, मो.८०८७४४७७६७ म्ब्युलन्स क्रमांक एम.एच.०६ बीडब्ल्यू ५४०७.

# पाच थरावर सलामी देणाऱ्या गोविंदाचा सत्कार

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरूड तालुक्यातील इतिहासात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या लाखमोलाच्या दही हंडी स्पर्धेत भंडारी समाजाच्या गोविंदांनी पाच थर लावून यशस्वी सलामी दिली होती. त्यामुळे मुरुड भंडारवाडा भंडारी समाज यांच्या वतीने या सलामी देणाऱ्या पुरुषांमध्ये कु. दैविक पाटील व महीलांमध्ये कु. सानिका खेडेकर हिचा जाहीर सत्कार करण्यात आला.

मंगळवार दि.२३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ८:३० वाजता श्री काळभैरव मंदिरामध्ये या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. श्री काळभैरव देवस्थान ट्रस्ट विश्वस्त भंडारी समाज अध्यक्ष सुभाष पाटील यांच्या हस्ते या दोन्ही गोविंदांचा पूष्प गुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. या सोहळ्याप्रसंगी उपाध्यक्ष चंदन खोत, अशोक पाटील, दिपक पालशेतकर, प्रकाश मयेकर यांच्या सह भंडारी समाज बांधव उपस्थित होते.



श्री गणेशाचे आगमन जवळ आले असून पनवेल तालुक्यातील तुराडे मूर्तीशाळेत गणरायाच्या मुर्तीचे आखणी करताना मुर्तीकार भावेश रसाळ (छाया. वैभव लबडे )

# महावितरण विरोधात कासु विभागातील ग्रामस्थांचा ठिय्या आंदोलनाचा इशारा

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील कासु विभागात अनियमित विद्युत पुरवठा व कमी दाबाने विद्युत पुरवठा होत आसल्याने महावितरणच्या विरोधात पेण उपविभागिय कार्यालयासमोर शुक्रवार दिनांक २६ /०८/२०२२रोजी ठिय्या आंदोलनाचा ईशारा कासु विभागातील ग्रामस्थांनी दिला आहे.

पेण तालुक्यातील सालिंदे -कासू येथे नवीन ६३ घथ विद्युत जनित्राचे काम युद्ध पातळीवर सुरु करावे.,विद्युत पुरवठा खंडित करण्यापुर्वी नागरिकांना कळविण्यात यावे व त्वरित चालू करावे.कमी जास्त विद्युत दाबमुळे मागील २-३ वर्षा पासून जे घरगुती विद्युत उपकरण बिघडले त्याची नुकसान भरपाई मिळावी,रात्रीच्या वेळी पांडापूर कार्यालयात कर्मचा-यांची नियुक्ती करावी.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## केंद्र शासनाच्या योजना तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवाव्यात

अन्न प्रक्रिया योजनेच्या लाभार्थ्यांनी निर्मित केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन, जिल्हा निवडणूक कार्यालयाच्या वतीने मतदार कार्डचे आधार लिंक करण्याबाबत तसेच माझा गणेशोत्सव, माझा मताधिकार या स्पर्धेची माहिती देण्यासाठी व आधार लिंक करण्यासाठी दालन उभारण्यात आले होते. या दालनाद्वारे जवळपास ४१ मतदारांचे आधार लिंक करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रतिम सुतार यांनी केले.

## 'बाप्पा'च्या आगमनाला खड्ड्यांचे विघ्न ; डांबरीकरण रस्त्यावर मातीचा मुलामा

सुस्त असल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. खड्डे भरताना जांभा दगड आणि रस्त्यालगतची मातीचा वापर करत वरच्यावर सिमेंट लावले जातंय. मात्र, अधूनमधून पडत असलेल्या पावसामुळे घाईगडबडीत करण्यात येणारे काम निरूपयोगी ठरणार असल्याचं बोललं जातं आहे. ही माती पूर्णपणे वाहून उघडे पडलेल्या खड्ड्यांमध्ये पाणी साचते.

अशावेळी वाहने खड्ड्यांतून घसरून किंवा उसळल्यामुळे मोठे अपघात होत आहेत. ही बाब प्रशासनाला माहीत असूनही खड्डे योग्य पद्धतीने बुजविण्याचे सौजन्य न दाखवल्याने गंभीर धोके कायम आहेत. जांभ्या दगडाने खड्डे बुजविण्याची उपाययोजना म्हणजे केवळ मलमपट्टीच होत आहे. कारण दोन दिवसातच बुजविलेले खड्डे पुर्ववत होत असल्याने ही उपाययोजना कुचकामी ठरत आहेत.

मे.पांडे सो. यांचे कोर्टात

**ॲड.निलेश द. हातमोडे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो यांचे कोर्टात
क्रिमिनल एम.ए.नं.९३३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०४/१०/२०२२

श्री.यशपाल गणेश शिवकर
वय : ३८ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.पो.केळवणे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत केळवणे
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांची पत्नी कै.प्रभावती यशपाल शिवकर दि.०३/०३/२०१० रोजी मु.पो.केळवणे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहे. वरील अर्जदार श्री.यशपाल गणेश शिवकर यांची पत्नी प्रभावती यशपाल शिवकर यांचे मृत्यू नोंदणी करण्यासाठी व मृत्यूदाखला मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेले आहे. तरी सदर अर्जाबाबत इतर कोणाचा हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीची कोणतीही हरकत न दाखवल्यास सदरहू अर्जदारांच्या मागणीनुसार मृत्यू नोंद होवून मृत्यू दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२४/०८/२०२२ रोजी दिली.

**सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**

मा.गोडसे सो

**ॲड.संध्या लोखंडे**

**जाहीर नोटीस**

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१२४६/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.३०/०९/२०२२

श्री.प्रवीण दाणू ओगानिया
रा.बी/३/५/१-४
से.१५, वाशी, ता व जि.ठाणे, नवी मुंबई — अर्जदार
विरुद्ध
१) श्री.संजय प्रविण ओगानिया
रा.बी/३/५/१-४
से.१५, वाशी, ता व जि.ठाणे, नवी मुंबई
२) सौ.शिल्पा संतोष उग्रेजा
रा.विजात नगर, आर सी मार्ग समोर,
नवजीवन सो.चेंबुर, मुंबई ४०००७४
३) श्री.सुनील प्रविण ओगानिया
रा.बी/३/५/१-४
से.१५, वाशी, ता व जि.ठाणे, नवी मुंबई — सामनेवाले

वरील अर्जदार यांची पत्नी व सामनेवाले नं.१ ते ३ यांची आई कै.लक्ष्मी प्रवीण ओगानिया ह्या दि.१८/०३/२०१७ रोजी बी.एल.९/१७ बापोड जकात नाका, वडोदरा गुजरात येथे मयत झाल्या. तसेच मयत कै.लक्ष्मी प्रवीण ओगानिया यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन ''अ''**
**शॉप नं.0३, तळमजला, छत अपार्टमेंट को.ऑ.हौ.सो., प्लॉट नं.0३, सेक्टर-१२, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड-४१0२0९**
**मालमत्ता खरेदी किंमत : रुपये ७,00,000/- (रुपये सात लाख मात्र)**

**मालमत्तेचे वर्णन ''ब''**
**परवाना क्रं.सी-00९, लॉटरी टिकीट पीच नं.१३, प्लॉट नं.0३, सेक्टर १ ए, वाशी, नवी मुंबई**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२४/०८/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पोर्ट महासंघाची वेतन कराची पहिली सभा दिल्ली येथे संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

अखिल भारतीय पोर्ट महासंघाच्या वेतन कराराची पहिली सभा २३ ऑगस्ट २०२२ रोजी नवी दिल्ली येथे आयपीए चे चेअरमन श्री जलोटा यांच्यासोबत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या सभेमध्ये जेएनपीए बंदरातील राष्ट्रीय कामगार नेते सुरेश पाटील व इतर सहा महासंघाचे वेतन कराराचे सदस्य यांनी सहभाग घेतला.

या सभेमध्ये मागणी पत्रावर मॅनेजमेंटने दिलेल्या जाचक मार्गदर्शक तत्वे मागे घ्या असा आवाज कामगार नेते व वेतन कराराचे सदस्य सुरेश पाटील यांनी उठविला. तसेच या बैठकीत भारतीय मजदूर संघाने कामगारांना कॅफेटरिया मिळाला पाहिजे अशी मागणी केली. मागील वेतन करारातील कामगारांच्या हिताचे राहिलेले पेंडिंग विषयी स्थानिक व्यवस्थापनाशी चर्चा करून सोडवावेत अशी सूचना चेअरमन यांनी केली.

तसेच ज्या संघटनेला पोर्ट मध्ये ऑफिस नाही त्या संघटनेला ते ऑफिस मिळाले पाहिजे अशी मागणी केली.या मीटिंगमध्ये कामगारांना बोनस लवकरात लवकर देण्याचे मान्य झाले.

जेएनपीटीतील भारतीय मजदूर संघाचे वेतन कराराचे प्रतिनिधी म्हणून राष्ट्रीय कामगार नेते सुरेश पाटील आणि गोपी पटनायक- विशाखापट्टणम तसेच इतर महासंघाचे प्रतिनिधी उपस्थित होते तसेच सर्व बंदरांचे चेअरमन उपस्थित होते. या वेतन कराराची पुढील सभा मुंबई येथे घेण्याचे निश्चित केले.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# बोर्लीपंचतनमध्ये मोकाट गुरांचा उपद्रव वाहतुकीला अडथळा

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन शहरात मोकाट जनावरांचा सुळसुळाट झाला असून, रस्त्यांवरील वाहनचालकांच्या डोक्यावर कायम अपघाताची टांगती तलवार असते. रस्त्यांवर आपली गुरेढोरे सोडून वाहतूक व नागरिकांना अडचण निर्माण करणाऱ्या मालकांविरुध्द ग्रामपंचायत च्या सहकार्याने स्थानिक पोलिसांनी मध्यस्थी करत गुरांच्या मालकांवर कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागलीय.

बोर्लीपंचतन गावातून जाणाऱ्या दिघी - श्रीवर्धन मुख्य जिल्हा मार्गावर एक किलोमीटरच्या भागात दिवसा गुरांचा उपद्रव असतो. रात्रीच्या वेळी शहराच्या अंतर्गत रस्त्यांवर मोकाट गुरे ठाण मांडून असतात. त्यामुळे त्यांना धडकून अपघात होण्याच्या घटना घडत आहेत. अनेक वेळा वाहतुकीचाही खोळंबा होतो. शहरात गेली अनेक वर्षे मोकाट गुरांचा उपद्रव होत असूनही त्यावर ठोस उपाययोजना झालेली नाही. बोर्लीपंचतन शहर व लगतच्या गावातील काही शेतकरी भातपेरणी आणि लावणीच्या कामांपुरतेच गुरांचा वापर करतात. त्यानंतर या गुरांना पोसणे त्यांना परवडत नसल्याने ती मोकाट सोडून दिली जातात. ही जनावरे दिवस-रात्र शहरात भटकत असतात.

शहरातील भाजी विक्रेते, फळ विक्रेते यांना मोकाट जनावरांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विक्रेत्यांचे लक्ष जरा इकडे तिकडे झाल्यास दुकानातील भाजी अथवा फळे या गुरांकडून फस्त होतात.

मुंबई पोलिस ॲक्टनुसार याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात येतो. यात एक महिन्याची शिक्षा व ३ हजार रुपयांचा दंड करण्यात येतो. असा प्रकार सातत्याने करण्यात येत असेल तर ५ हजार रुपयांचा दंड व सहा महिन्यांच्या शिक्षेची तरतूद आहे. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना अशी कारवाई करण्यात रोखण्याचा प्रयत्न केल्यास सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी कारवाई करण्यात येते. या तक्रारीशिवाय नेहमीच्या तक्रारीनुसार प्रत्येक गुरामागे ५५० रुपयांचा दंड आणि गुराच्या रोजच्या चाऱ्यापोटी ६० रुपये शुल्क जनावरांच्या मालकाकडून आकारण्यात येतो.

बोर्लीपंचतन येथे कोंडवाडया साठी मागणी होऊन सुद्धा निधी मिळत नाही. बाजूच्या ग्रामपंचायत मध्ये जनावारे बंदी केली असता त्यांना खान्यासाठी चारा उपलब्ध करण्यासाठी ग्रामपंचायतीला अर्थ साहाय्य मिळत नाही. अशामुळे एखदया जनावरांचा मृत्यु झाल्यास ग्रामपंचायतिला नाहक कारवाईला सामोरे जावे लागते.

ग्रामपंचयतीच्या वतीने मासिक सभेला प्रत्येक वेळी मोकाट जनावरांचा विषय घेतला जातो. पुढे अमलबजावणी करण्यासाठी गावातुन दवंडी पिटवुन सूचना दिल्या जातात. ग्रामपंचायत नोटिस फलकावर सूचना दिल्या जातात. जनावरांच्या मालकांना सहकार्य करण्याचे सांगितले जाते. शांतता बैठकीत देखील यावर चर्चा झाली, पोलिसांनी यामध्ये पुढाकार घेतला तर मोकाट गुरांचा प्रश्न निकाली निघू शकतो, असे सरपंच ज्योती परकर यांनी सांगितले.

# ना. प्रल्हादसिंह पटेल यांनी घेतले बल्लाळेश्वरांचे दर्शन

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेले केंद्रीय अन्नधान्य व विकास राज्यमंत्री प्रल्हाद सिंह पटेल यांनी पाली सुधागड गावाला धावती भेट देत भाजप नेते व युवा कार्यकर्त्यांशी चर्चा केली.

आज पहाटे ८ वा. च्या सुमारास ना. पटेल यांनी पालीतील बल्लाळेश्वर गणपतीचे दर्शन घेत मंत्रोपचाराने मनोभावे पूजा केली. यावेळी ना. प्रल्हादसिंह पटेल यांचा बल्लाळेश्वर गणपती मंदिर समितीतर्फे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला.



आपल्या छोटेखाणी कार्यक्रमात ना. पटेल यांनी पाली बल्लाळेश्वर गणपती मंदिर समिती अध्यक्ष व इतर कार्यकारी सभासद यांच्याशी चर्चा केली. प्रसिद्ध अष्टविनायक गणपती पैकी पाली येथील एक गणपती असलेल्या पाली बल्लाळेश्वर गणपती मंदिराबद्दलची अधिक माहिती यावेळी ना. प्रल्हादसिंह पटेल यांना समिती तर्फे देण्यात आली.

तसेच अष्टविनायक यात्रेला असलेले महत्व यावेळी सांगितले.त्यानंतर पाली शहरातून बाईक रॅली काढण्यात आली. यावेळी ना. पटेल यांनी देखील स्वतः बाईक चालवत या बाईक रॅलीत सहभाग घेतला.

बाईक रॅली मध्ये तरुण वर्गाने मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.यावेळी दक्षिण विभाग जिल्हाध्यक्ष आम. प्रशांत ठाकूर, संयोजक वैकुंठ पाटील, उप संयोजक अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, युवा मोर्चा अध्यक्ष अमित घाग, सुधागड तालुका भाजप अध्यक्ष चंद्रकांत घोसाळकर यांच्यासह तालुका व शहरातील शेकडो कार्यकर्ते उपस्थिती होते.

# मुंबई-गोवा हायवेवर अवजड वाहनांना बंदी घालण्याची प्रवाशांची मागणी

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

मुंबई-गोवा महामार्ग ६६ वर सतत मोठया प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक सुरु असून सहा दिवसांवर गणेश उत्सव येऊन ठेपला असून चाकरमानी यांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी गणेश उत्सव काळात त्वरित बंदी घालण्यात यावी अशी मागणी प्रवाशी वर्गातून केली जात आहे.



गणेश उत्सवासाठी असंख्य चाकरमानी मुंबई-गोवा महामार्गावरून प्रवास करीत असतात. परंतु या महामार्गावर अवजड वाहनांची मोठया प्रमाणात वर्दळ सुरु असते ४० टनची कॅपिसिटी असलेल्या अवजड वाहनात ५० ते ६० टन माल भरून असंख्य अवजड वाहने या महामार्गावरून ये-जा करीत असतात.याकडे संबंधितांनी लक्ष न दिल्यामुळे या मार्गाची अवस्था अतिशय बिकट झाली असून या मार्गानी प्रवास करणे धोक्याचे झाले आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील रस्त्याला मोठया प्रमाणात पडलेले खड्डे गणेश उत्सवापूर्वी बुजविण्यासाठी विविध संस्थांनी जनआंदोलन केल्यानंतर या महामार्गावरील खड्डे भरण्यासाठी सुरुवात झाली आहे.परंतु या महामार्गावर सतत सुरु असणारी अवजड वाहनांची वाहतुकीमुळे खड्डे भरूनही परिस्थिती जैसी थे अशी होईल यामुळे या मार्गांवरून गणेश उत्सवसाठी गावाला जाणारा चाकरमानी घरी वेळेवर जाईल याची खात्री देता येत नाही.यामुळे संबंधितांनी याकडे लक्ष देऊन गणेश उत्सवा पर्यंत अवजड वाहनांची वाहतूक बंद करावी अशी मागणी प्रवाशी वर्गातून केली जात आहे.


**सर्व प्रकारच्या जाहिरातींचे उत्तम माध्यम**
**दैनिक रायगड नगरी**
**9619979706 / 9619737911**

# गणेशोत्सवा पूर्वीच माथेरानचे रस्ते झाले चकाचक

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान या पर्यटन नगरीतील जवळजवळ संपूर्ण भागातील रस्त्यांची स्वच्छता सुरू करण्यात आली आहे. लवकरच सर्वांच्या लाडक्या गणरायाचे आगमन होणार असल्याने पावसाळ्यात पेव्हर ब्लॉक रस्ते शेवाळामुळे चिकट होत असतात आणि अनेकदा त्यावरून चालताना अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याबाबत नगरपरिषदेच्या कार्यक्षम प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे-शिंदे यांना या छोट्याशा गावाची अल्पावधीतच संपूर्ण माहिती असल्याने त्यांच्या सूचनेनुसार नगरपरिषदेच्या कर्मचारी वर्गाने येथील संत गाडगे महाराज रोड, इंदिरा गांधी नगर,दस्तुरी कडे जाणारा मुख्य रस्ता त्याचप्रमाणे गावातील बहुतेक ठिकाणी या पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यावर ब्लिचिंग पावडर टाकून स्वच्छता करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.



# नातेवाईकांना भेटण्यास गेलेले इसम झाला बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबई येथील नातेवाईकांना पनवेल येथून भेटण्यासाठी गेलेला पती अद्याप घरी न परतल्याने तो हरवल्याची तक्रार त्याच्या पत्नीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली आहे. मोहम्मद बिलाल उमर कच्छी ( वय २८ ) राहणार कच्छी मोहल्ला, पनवेल, रंग गोरा, उंची पाच फूट पाच इंच, चेहरा लांबट, नाक सरळ, केस काळे असून अंगात निळ्या रंगाची फुल जिन्स पॅन्ट, निळ्या रंगाचा टीशर्ट, हातात ब्राऊन रंगाचे घडयाळ, पायात चप्पल असून त्याला हिंदी, तेलगू भाषा अवगत आहे. डाव्या हाताच्या मनगटावर चरबीची गाठ आहे. सोबत मोबाईल फोन आहे. या इसमा बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे फोन - ०२२- २७४५२३३३ किंवा सहा. पोलीस निरीक्षक शरद ढोले यांच्याशी संपर्क साधावा.

**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, रायगड यांचे कार्यालय**
शुक्रतारा बिल्डींग, तळमजला, कामत आळी,
सतक्रार प्रेस समोर, ता.अलिबाग, जि.रायगड
दुरध्वनी क्रमांक/फॅक्स क्र.०२१४१-२२२०१३
ईमेल : camofaraigad@gmail.com

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये मानीव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

अर्जदार पंचवटी रिव्हरसाईड सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. सर्व्हे नं.१५८/६, १५८/७, १५८/१, उसर्ली खुर्द, ता.पनवेल, जि.रायगड यांनी गैरअर्जदार कर्नाळा इंटरप्राइझेस तर्फे भागीदार (जागा मालक व बिल्डर) १) श्री.विवेकानंद शंकर पाटील, आस्वाद बंगला, सेक्टर-१, नवीन पनवेल (पूर्व), ता.पनवेल, जि.रायगड २) श्री.एकनाथ रघुनाथ भोपी (मयत) यांचे वारस २.१) श्रीमती.राजश्री एकनाथ भोपी (पत्नी) २.२) श्री.श्रीनाथ एकनाथ भोपी (मुलगा) २.३) श्रीम.रामुबाई रघुनाथ भोपी (आई) २.१ ते २.३ सर्व रा.पाली देवद, ता.पनवेल, जि.रायगड ३) श्री.मुकूंद शालिक म्हात्रे रा.शॉप नं.१, श्रीजी कृपा बिल्डींग, एचओसी कॉलनी समोर, ओल्ड ठाणा नाका रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांचेविरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमचे कलम ११ अन्वये खालील मालमत्तांचे एकतर्फी मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करून मिळणेबाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**पनवेल येथील गट नं.१५८/६, क्षेत्र ५३० चौ.मी. गट नं.१५८/७ क्षेत्र १०६० चौ.मीटर, गट नं.१५८/१ क्षेत्र २७८० चौ.मी. असे एकूण ४३७० चौ.मी.**

अर्जदारांचे अर्जाबाबत सर्व संबंधितांना आपले म्हणणे सादर करणेसाठी संधी मिळावी म्हणून या कार्यालयाने सुनावण्या घेतल्या आहेत. त्यामध्ये सदर अर्जाबाबत गैरअर्जदार क्र.१ ते ४ ह्यांचे नोटीस पाकीट ''Door Locked'' व ''Addressee Cannot be loccated'' अशा पोस्टाच्या शेऱ्यासह परत आले आहे. त्यामुळे गैरअर्जदार यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी मिळावी म्हणून दि.२६/०९/२०२२ रोजी १२.०० वाजता अंतिम सुनावणी निश्चित केली आहे. तरी सर्व गैरअर्जदार यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी सदर रोजी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून त्यांचे म्हणणे मांडावे. तसेच वरील मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दि.२६/०९/२०२२ पूर्वी या कार्यालयात दाखल करावे. अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून आपले गैरहजेरीत एकतर्फी कामकाज करून उचित निर्णय घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २२/०८/२०२२

**सही/-**
**(डॉ.सोपान शिंदे)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

श्री.मुजावर सो
**अर्जदारांकरिता ॲडव्होकेट : ॲड.उदय प्र. मोकल**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.८७६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२९/०८/२०२२

(कै.अब्दुल रऊफ अब्दुल मजीद फरीदी
उर्फ फरीदी अब्दुल रऊफ यांचे कायदेशीर वारस)
अब्दुल सत्तार फरीदी व इतर ६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.अब्दुल रऊफ अब्दुल मजीद फरीदी उर्फ फरीदी अब्दुल रऊफ यांचे निधन दि.१२/०८/२०२१ रोजी खांदा कॉलनी येथे त्यांच्या राहत्या घरी झालेले आहे. कै.अब्दुल रऊफ अब्दुल मजीद फरीदी उर्फ फरीदी अब्दुल रऊफ यांच्या मृत्यूपश्चात वरीलपैकी अर्जदार हे कै.अब्दुल रऊफ अब्दुल मजीद फरीदी उर्फ फरीदी अब्दुल रऊफ कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.अब्दुल रऊफ अब्दुल मजीद फरीदी उर्फ फरीदी अब्दुल रऊफ यांनी तसेच त्यांचा भाऊ म्हणजे अर्जदार क्रं.४ अब्दुल रहमान फरीदी उर्फ फरीदी अब्दुल रहमान व वडील कै.फरीदी अब्दुल मजीद अब्दुल हकीम यांनी नवीन पनवेल, पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनित सदनिका खरेदी केलेली आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**मौजे : खांदा कॉलनी-नवीन पनवेल (प.) ता.पनवेल, जि.रायगड**
**सदनिका क्रं. : एफ-८/अे/०२, मजला : तळमजला**
**नवरत्न को.ऑप.हौ.सोसायटी, सेक्टर-८, प्लॉट नं.१**
**क्षेत्रफळ : ७०.०० स्क्वे.मीटर**

सदर वरील वर्णनित स्थावर मिळकतीचे वारस दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कै.अब्दुल रऊफ अब्दुल मजीद फरीदी उर्फ फरीदी अब्दुल रऊफ यांच्या हिश्श्यात अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २०/०८/२०२२

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : वाजे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकत / जमीन ही आमचे अशिल श्री.अविनाश पांडुरंग घरत, रा.१०१, डी-विंग, श्रराज नगर, उरण, ता.उरण, जि.रायगड यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वाजे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गाव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| वाजे | कुमार शामकांत पाटील<br>कल्पना संतोष पाटील<br>आदिती संतोष पाटील<br>प्रणाली संतोष पाटील<br>विक्रांत सतोष पाटील<br>प्रणाली व विक्रांत<br>अ.पा.क.आई<br>कल्पना संतोष पाटील | १०० | ०-५३-००<br>पो.ख.०-०७-४०<br>एकूण क्षेत्र ०-६०-४० | ६.२६ |
| | एकूण विक्री करावयाचे क्षेत्र ०-३०-०० (३० गुंठे) | | | |

सदरहू वर ही जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तााारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातल नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या हरकती / तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २४/०८/२०२२

**सही/-**
**ॲड.महेश भगत**
**पत्ता : शॉप नं.२२, कल्पतरु कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.५१, सेक्टर नं.९, खांदा कॉलनी, नवीन पनवेल-पश्चिम, ता.पनवेल, जि.रायगड**
**मोबा नं.८६५५१५८७८१**

श्री.मुजावर सो
**अर्जदारांकरिता ॲडव्होकेट : ॲड.उदय प्र. मोकल**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१००७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२९/०८/२०२२

(कै.रामचंद्रन केशव यांचे कायदेशीर वारस)
१) श्री.शिराजकुमार रामचंद्रन (मुलगा)
वय : ४६ वर्षे, धंदा : नोकरी
आधार कार्ड नं.७६२४६५४९६३४०
२) श्री.शीलजकुमार रामचंद्रन (मुलगा)
वय : ४३ वर्षे, धंदा : नोकरी
आधार कार्ड नं.८९६८९६७४७३२०
अर्जदार १ व २ रा.अे/२०१, रिद्धी कॉम्प्लेक्स २,
प्लॉट नं.३८/४१, सेक्टर नं.१३, खांदा कॉलनी,
न्यू पनवेल (पश्चिम), पिन कोड-४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.रामचंद्रन केशव यांचे निधन दि.१३/०६/२०२१ रोजी किंग एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल आणि मेडीकल कॉलेज मुंबई येथे झालेले आहे. कै. रामचंद्रन केशव यांच्या मृत्यू पश्चात वरीलपैकी अर्जदार हे कै. रामचंद्रन केशव कायदेशीर वारस आहेत.

अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.रामचंद्रन केशव व श्री.शीलजकुमार रामचंद्रन यांनी मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनित निवासी सदनिका खरेदी केलेली आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**मौजे : खांदा कॉलनी, पनवेल (नवी मुंबई), ता.पनवेल, जि.रायगड येथील निवासी सदनिका**
**मौजे : खांदा कॉलनी, पनवेल (पश्चिम),**
**फ्लॅट क्रं.२०१, वींग-अे, दुसरा मजला,**
**प्लॉट नं.३८, ३९, ४०, ४१, सेक्टर-१३,**
**क्षेत्रफळ : ५२५.00 चौरस फुट**

सदर वरील वर्णनित स्थावर मिळकतीचे वारस दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कै.रामचंद्रन केशव यांचे हिश्श्यात अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २०/०८/२०२२

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



RELIANCE HOSPITAL
Every Life Matters
NAVI MUMBAI

आता आहे

Kokilaben Dhirubhai Ambani
hospital
NAVI MUMBAI
Every Life Matters

आमच्या आरोग्य सेवेची पुनर्व्याख्या
आमचा ठसा मजबूत करत आहे

EMERGENCY
+91 22 7198 1111

APPOINTMENTS & BOARD LINE
+91 22 7197 9797

Thane-Belapur Road, Opp Koparkhairane Station, Navi Mumbai – 400 710, India; navimumbai.kokilabenhospital.com /KDAHNaviMumbai